**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०३ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सखाराम भिमराव कलाल<br>प्लॉट क्र.४०६/६, आर.के.नगर,<br>पांचगाव, कोल्हापूर- ४१६ ०१३ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय,<br>(उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,<br>कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | हजर |

अपीलकर्ते श्री. सखाराम भिमराव कलाल यांनी आपल्या वेतननिश्चितीच्या संदर्भात तीन मुद्दयांची माहिती मागितली होती. अशा प्रकारची माहिती संकलित केली गेली नसल्याने ती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, पुणे यांनी त्यांना कळविले. नेमणूक दिनांकापासून वेतन निश्चिती करून मिळण्याची श्री. कलाल यांची मागणी आहे. सन १९८७ पासून ते हा विषय विविध पातळ्यांवर मांडत आले आहेत. 'प्रकरण नियमानुसार तपासून योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी व त्याप्रमाणे श्री. कलाल यांना कळवावे,' असे शिक्षण संचालक (उच्च शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, यांनी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना दि. [illegible].४.२००७ च्या पत्रान्वये कळविले. परंतु अद्यापपर्यंत आपल्याला काहीही कळविले गेलेले नाही, असे श्री. कलाल यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात नमूद केले आहे.

श्री. कलाल यांच्या मागणी संदर्भातील त्रुटींची पूर्तता करण्याबद्दल त्यांच्याशी पत्रव्यवहार केला असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले. मात्र अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय

सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी त्रुटींची नेमकी माहिती आज दि. ९.७.२००८ रोजी दिली, त्यानुसार पूर्तता करीत आहे, असे श्री. कलाल यांनी नमूद केले.

अपीलकर्त्यांची मागणी ही वेतन निश्चितीची कार्यवाही होण्याची आहे. अशी मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र संबंधित माहिती श्री. कलाल यांना पूर्वीच दिली जाणे आवश्यक होते. वर्ष-वर्ष हे प्रश्न प्रलंबित राहतो आणि त्यासंदर्भातील माहितीही नागरिकांना दिली जात नाही, हे समर्थनीय नाही. माहिती संकलित केलेली नसल्यामुळे देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांचे उत्तर योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकारी यांनी दर्शविल्यानुसार त्रुटींबाबतची पूर्तता अपीलकर्ता श्री. कलाल यांनी करावी व त्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांनी अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी. या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १६.८.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. ३१ .७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजल
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १९.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०३ + ६३१ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. कासम हैदर शेख<br>E/५०, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे-६ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रशासकीय अधिकारी, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे-४११ ००१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे-४११ ००१ | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. कासम हैदर शेख यांनी दोन स्वतंत्र अर्जान्वये भविष्य निर्वाह निध संदर्भातील माहिती मागितली होती. दोन्ही जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या प्रश्नांना उत्त व विचारणा केलेल्या मुद्द्यांसंबंधी माहिती पत्राद्वारे अपीलकर्त्यास दिली. मात्र माहिती समाधानकारव नाही व आपली तक्रार कायम आहे, असे श्री. शेख यांनी सांगितले.

उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता अपीलकर्त्यास त्यांच्या मूळ अर्जानुसा मुद्देनिहाय माहिती देण्यात आली आहे. यापेक्षाही काही माहिती हवी असल्यास जन माहिती अधिकार यांनी ती देण्याचे कबूल केले व त्यास अपीलकर्त्याने मान्यता दिली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. प्राप्त माहितीशिवाय मूळ अर्जातील संदर्भानुसार अधिक माहिती हवी असल्या अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीप्रमाणे नियमानुसार माहिती जन माहिती अधिकारी यांनी द्यावी.

पुणे
दि. २५.७.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

[illegible]

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शिवाजी ईश्वर पाटील<br>२री गल्ली, इंद्रप्रस्त अपार्टमेंट, जयसिंगपूर,<br>ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याध्यापक, सौरभ मतिमंद मुलांची शाळा,<br>जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अध्यक्ष /सचीव, एकता शिक्षण प्रसारक मंडळ,<br>उदगाव, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. शिवाजी ईश्वर पाटील यांनी सौरभ मतिमंद मुलांची शाळा, जयसिंगपूर येथील जून १९९९ पासून जून २००७ पर्यंतचे कर्मचारी हजेरी पत्रकांच्या झेरॉक्स प्रतींची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सौरभ मतिमंद मुलांची शाळा, जयसिंगपूर यांनी माहिती दिली नाही. शुल्क भरण्याबाबत दूरध्वनीवरून व अपीलकर्त्याच्या पत्नीमार्फत कळविले, परंतु शुल्क भरलेले नाही, असे मुख्याध्यापिका सौरभ मतिमंद मुलांची शाळा, जयसिंगपूर यांचे दि. १८.७.२००७ चे पत्र आहे. परंतु त्यात शुल्काचा तपशील नाही. तो देणे आवश्यक होते. त्यांच्या दि. २८.७.२००७ च्या पत्रात असाच उल्लेख असून शुल्कापोटी ५००/- रू. भरण्यास कळवले. अपीलकर्त्याने सचिव, एकता शिक्षण प्रसारक मंडळ, उदगाव यांच्याकडे अपील केले. अपिलास दि. २१.१.२००८च्या पत्राने अध्यक्ष, एकता शिक्षण प्रसारक मंडळ, उदगाव यांनी उत्तर दिले. त्यामध्ये अपीलकर्त्याच्या अर्जासंबंधी समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना कळविले असल्याबाबत व त्यांच्याशी संपर्क साधण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी मुख्याध्यापक, सौरभ मतिमंद

मुलांची शाळा, जयसिंगपूर यांना माहिती देण्याविषयी दि. १९.६.२००७ व दि. २४.९.२००७ च्या पत्राने कळविले. परंतु अद्यापही माहिती दिल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी दोन्हीही विशेष अपील निर्गत कार्यक्रमामध्ये उपस्थित नव्हते. तसेच त्यांनी लेखी निवेदनही सादर केलेले नाही. मात्र समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, कोल्हापूर हे उपस्थित होते. सदरची संस्था त्यांच्या नियंत्रणाखाली आहे.

सर्व बाबींचा विचार करता व जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची गैरहजेरी, उपलब्ध कागदपत्रे, निवेदन सादर न केल्याने निर्माण होणारी शंकास्पद परिस्थिती पाहाता यामध्ये माहिती देण्यास जाणून बुजून टाळाटाळ केल्याचे दिसून येते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास तात्काळ, निःशुल्क माहिती द्यावी. त्याबाबतची आठ दिवसात पुर्तता न झाल्यास समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी त्यांचेवर कारवाई करून अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 29 .७.२००८

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. नामदेव बाबासाहेब खरात<br>नितीराज निवास निरा, ता पुरंदर, जिल्हा पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | चेअरमन/सचीव<br>जय मल्हार विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, जेऊर, ता.पुरंदर, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुरंदर, ता.पुरंदर, जि पुणे | हजर |

जमिनीवरील कर्जाबाबत जय मल्हार विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., जेऊर यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्त्याने केली होती. पत्रव्यवहाराच्या प्रतींसह संपूर्ण तपशील त्यांनी मागितला होता.

जन माहिती अधिकाऱ्यांनी उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोहोच पावतीने दि. ३०.१२.२००६ रोजी पाठविली. मात्र अपीलकर्त्याने ती न स्वीकारल्याने परत आली. अपीलकर्त्याने फेरअर्ज सादर करून आवश्यक माहितीची मागणी स्पष्ट स्वरूपात करण्याची सूचना अपिलीय प्राधिकाऱ्यांनी केली. तसेच देय माहिती १५ दिवसांत व निःशुल्क देण्याचा आदेश त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना दिला. त्यानुसार माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. त्यावर अपीलकर्त्याने मुख्य सचिवांना पाठविलेल्या निवेदनाची प्रत आयोगाकडे दि. २३.८.२००७ रोजी पाठविली.

आपण जयमल्हार संस्थेकडून कधीही कर्ज मागणी केलेली नव्हती. तरीही बनावट कर्जप्रकरण आपल्या नावे तयार करून आपल्या खात्यावरून बनावट पेस्लीपद्वारे पैसे काढण्यात आले. त्याची चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी अपीलकर्त्याची मागणी असल्याचे कागदपत्रांवरून दिसते. मात्र श्री. खरात दि. २८.२.१९९६ पासून संस्थेकडून कर्ज घेत असून कारखाना ऊस बिलातून हप्तेकपात होत आली आहे, असे संस्थेच्या सचिवांनी नमूद केले आहे. हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ०७.७.२००८

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१० / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. अब्दुल गुलामनबी पटेल<br>१२, ग्रीन व्ह्यू अपार्टमेंट, दत्त मंदिराजवळ,<br>रमणमळा, कोल्हापूर- ४१६ ००३ | |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक नगर रचनाकार, कोल्हापूर नागरी समूह,<br>शासकीय मध्यवर्ती इमारत, कसबा बावडा, कोल्हापूर | |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर | |

अपीलकर्ता श्री. अब्दुल गुलामनबी पटेल यांनी यु.एल.सी./ दाखला / एसआर/१०७४ / २००५ दि. २८.११.२००५ अन्वये दिलेल्या दाखल्याच्या प्रकरणी प्रतिज्ञापत्र व पत्रव्यवहाराची माहिती मागितली होती. प्रथम अपिलामध्ये आठ दिवसांत माहिती मोफत देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दिले. यावर जन माहिती अधिकारी यांनी सदरची संचिका व अभिलेख यांचा शोध घेतला असता ती आढळून येत नसल्याने माहिती दिली नसल्याचे नमूद केले. त्यानुसार अपीलकर्त्यांस लेखी कळविण्यात आले आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगर रचनाकार, कोल्हापूर नागरी समूह यांच्या कार्यालयातील उपरोक्त अभिलेख उपलब्ध न होणे ही गंभीर बाब आहे. या संदर्भात कार्यालय प्रमुखांनी अभिलेख शोधून काढणे किंवा त्या संदर्भात पुढील कार्यवाही करून दोषी आढळणाऱ्यांविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करणे आवश्यक होते. त्यांनी दोन्ही बाबी केलेल्या दिसून येत नाहीत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२ जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी उपरोक्त अभिलेखांबाबत चौकशी करुन व त्यानंतर आवश्यक असल्यास दोषी असणाऱ्यांविरूध्द तात्काळ गुन्हा दाखल करुन आयोगास अहवाल सादर करावा.

पुणे
दि. ३० .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र,राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे १.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रम' दि.९/७/२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३११/ कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपील कर्ता | श्री. अब्दुल अजीज गुलानबी पटेल<br>१२, ग्रीनव्हयु अपार्टमेंट, दत्त मंदिराजवळ<br>२ रा मजला, जि. कोल्हापूर-४१६००३ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप शहर अभियंता वि. का. क्र. ४.<br>कोल्हापूर महानगरपालिका,जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक संचालक नगररचना,<br>कोल्हापूर महानगरपालिका जि. कोल्हापूर | प्रतिनिधी हजर |

अपीलकर्ता श्री. अब्दुल अजीज गुलानबी पटेल यांनी ग्रीनव्हयु अपाटमेंटसंबंधी प्लॉटसह सर्व बांधकामाची माहिती नकाशासह मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलकर्त्याला माहिती घेऊन जाणेबाबत कळविले होते. प्रथम अपील निर्णयानुसार उपलब्ध अभिलेखानुसार आहे त्या स्वरुपात माहिती घेऊन जाणे बाबत दि. २१/०२/२००८ चे पत्राने अपीलकर्त्यास कळविण्यात आले. मात्र त्यांनी अद्याप मांहिती नेली नाही. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या चर्चेमध्ये माहिती साक्षांकित करुन दोन दिवसात देणेबाबत एकमत झाले.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्त्यास उपलब्ध अभिलेखानुसार मागणीप्रमाणे सर्व माहितीच्या साक्षांकित्त प्रती देण्यात याव्यात. जन माहिती अधिकारी यांनी आदेश प्राप्त झाल्या पासून आठ दिवसांत आयोगास पूर्तता अहवाल सादर करावा.

पुणे
दि.२२.०७.२००८

(विजय कुंवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

११७LetterOne

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१२ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजेंद्र वसंतराव चव्हाण<br>एस-५, सारंग अपार्टमेंट, सुधाकर नगर, कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>शहर विभाग, कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस अधीक्षक, कोल्हापूर | हजर |

अपीलकर्त्यांने मूळ अर्जानुसार मागणी केलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. अंशत: माहिती कलम ८ जी नुसार देण्यात आली नव्हती, असे दिसून येते. त्यावर अपीलकर्त्याने प्रथम व द्वितीय अपील केले आहे.

आज वरील तीनही घटकांत समक्ष झालेल्या चर्चेत अपीलकर्त्याचे या संदर्भात समाधान झाले असून त्यांनी अपील निकाली ठेवणेस संमती दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २९.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१३ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | १. श्री. शिरीष ऊर्फ बाळासो तुकाराम वरेकर<br>२. श्री. मायाप्पा सुबराव पुजारी<br>मु.पो. उदगाव, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,<br>शिरोळ तहसील, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. शिरीष ऊर्फ बाळासो तुकाराम वरेकर व इ. यांनी दि. २६.१२.२००७ च्या माहिती अर्जान्वये उदगाव टेक्निकल हायस्कूलमधील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी इ. संदर्भात आठ मुद्यांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जानुसार दि. २८.१२.२००७ व दि. ९.१.२००८ अशा दोन टप्प्यात माहिती दिली असल्याचे सांगितले. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी त्याला दुजोरा दिला. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास सही-शिक्क्यासह माहिती पुन्हा देण्याचेही कबूल केले.

उपलब्ध कागदपत्र पाहता मूळ अर्जातील मागणीनुसार माहिती दिल्याचे दिसून येते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.७.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधीर माधव जोशी — अपीलकर्ता
द्वारा वाय.वाय.साबणे
५८७, दत्तप्रसाद सोसायटी, पुणे सिंहगड रोड, पुणे-३०

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, एस.नं.४४/१,
वडगाव बु. ऑफ सिंहगड रोड, पुणे — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१३ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुधीर माधव जोशी
द्वारा वाय.वाय.साबणे
५८७, दत्तप्रसाद सोसायटी, पुणे सिंहगड रोड, पुणे-३०

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, एस.नं.४४/१,
वडगाव बु. ऑफ सिंहगड रोड, पुणे श्री.पी.व्ही.घोरपडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>आयकर ॲक्ट १९६१ अन्वये संस्थेबाबतची माहिती |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुधीर माधव जोशी यांनी सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे आयकर कायदा कलम १३२ नुसार संस्थेचे विश्वस्त श्री.पी.एम.नवले व सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या सर्च ॲक्शन संबंधातील अहवालाची मागणी केली होती. संस्थेने ही माहिती नाकारली.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांबाबत संथेत कुठलीही माहिती प्रदर्शित नसल्याने अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

माहिती ही आयकर खात्याकडील आहे, संस्थेने देण्याची नाही, असे निवेदन सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे प्रशासकीय अधिकारी श्री.पी.व्ही.घाटपांडे यांनी आयोगासमोरील सुनावणीमध्ये केले. संस्थेतर्फे सादर निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, संस्था विनाअनुदानित असून तिला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, असे प्रतिपादन श्री.घाटपाडे यांनी केले आहे. परंतु विनाअनुदानित शिक्षण संस्थांना हा कायदा लागू असल्याचे सरकारने पूर्वीच स्पष्ट केले आहे.

मागणी केलेली माहिती ही आयकर विभागाशी संबंधित असल्याने त्यांच्याकडे मागणी करावी, असे संस्थेने कळविल्यानंतर अपीलकर्त्याने केंद्रिय माहिती आयोगाकडे सदर मुद्दयावर केलेल्या अपिलाचा निर्णय क्र.५६१/आयसी(ए)/२००७, दि.२१.२.२००७ नुसार लागला आहे. सदरचे अपील हे फेटाळण्यात आले आहे, असे नमूद करुन श्री.घाटपांडे यांनी त्याची प्रत सादर केली.

सदरची माहिती ही आयकर विभागाशी संबंधित असून हा विषय केंद्रिय माहिती आयोगाच्या कक्षेतील आहे व दि.२१.२.२००७ च्या निर्णयानुसार माहिती न देण्याबाबतचा अपिलीय प्राधिकाऱ्याचा निर्णय केंद्रिय माहिती आयोगाने कायम केल्याचे दिसते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२१.७.२००८

july-०८ solapursangli३८-४०

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१४ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | १. श्री. मायाप्पा सुबराव पुजारी<br>२. श्री. शिरीष ऊर्फ बाळासो तुकाराम वरेकर<br>मु.पो. उदगाव, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | अध्यक्ष, ल.क. अकिवाटे औद्योगिक सहकारी वसाहत लि., अकिवाटे उद्यमनगर, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ तहसील, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर | प्रतिनिधी हजर |

अपीलकर्ते श्री. मायाप्पा सुबराव पुजारी व श्री. शिरीष ऊर्फ बाळासो तुकाराम वरेकर यांनी मागणी केलेली माहिती ही ते सदस्य असलेल्या म्हणजे उद्गाव ग्रामपंचायत, उद्गाव यांना संस्थेकडून कोर्ट हुकुमाप्रमाणे दर वर्षी देण्यात येणाऱ्या ठोक अंशदान विषयासंदर्भात आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यांशी वेळोवेळी संपर्क साधून माहिती प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. अपीलकर्त्यांने दि. ९.७.२००८ रोजी विशेष अपील निर्गत कार्यक्रमात उर्वरित अंशतः माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केले. आवश्यक ती माहिती मिळाल्याने अपीलकर्त्यांने समाधान व्यक्त केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१ .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१४ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | १. श्री. मायाप्पा सुबराव पुजारी<br>२. श्री. शिरीष ऊर्फ बाळासो तुकाराम वरेकर<br>मु.पो. उदगाव, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | अध्यक्ष, ल.क. अकिवाटे औद्योगिक सहकारी वसाहत लि., अकिवाटे उद्यमनगर, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ तहसील, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर | प्रतिनिधी हजर |

अपीलकर्ते श्री. मायाप्पा सुबराव पुजारी व श्री. शिरीष ऊर्फ बाळासो तुकाराम वरेकर यांनी मागणी केलेली माहिती ही ते सदस्य असलेल्या म्हणजे उद्‌गाव ग्रामपंचायत, उद्‌गाव यांना संस्थेकडून कोर्ट हुकूमाप्रमाणे दर वर्षी देण्यात येणाऱ्या ठोक अंशदान विषयासंदर्भात आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याशी वेळोवेळी संपर्क साधून माहिती प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. अपीलकर्त्याने दि. ९.७.२००८ रोजी विशेष अपील निर्गत कार्यक्रमात उर्वरित अंशतः माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केले. आवश्यक ती माहिती मिळाल्याने अपीलकर्त्याने समाधान व्यक्त केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 31 .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१६.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२४+३२५+३८९ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. मोहद्दीन महमद बिराजदार<br>मु. खानापूर, पो. म्हैसलगी, ता.अक्कलकोट,<br>जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. मोहद्दीन महमद बिराजदार यांनी उर्दू मदत शाळा, खानापूर येथील प्रभारी मुख्याध्यापक श्री. मांच यांच्या वेतनाच्या अनुषंगाने व दि. १.६.२००५ ते दि. २२.८.२००६ या कालावधीतील सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळेकडून शिक्षकांच्या मान्यतेच्या प्रश्नाबाबत माहिती मागितली आहे.

वरील दोन्ही पक्षकारांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे एकमत होऊन अपीलकर्त्याने माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.अल्लाबक्ष जमादार पाटील
मु.पो.वाकी (घेरडी), ता.सांगोला, जिल्हा सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, सांगोला — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत वाकी (घेरडी), ता.सांगोला, जिल्हा सोलापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ३२६ / सोलापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | ३१.१.२००८ |

**३.उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अल्लाबक्ष जमादार पाटील
मु.पो.वाकी (घेरडी), ता.सांगोला, जिल्हा सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, सांगोला श्री.जे.आर.अडसूळ

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी (घेरडी),
ता.सांगोला, जिल्हा सोलापूर तत्कालीन-श्री.एम.जी.पवार

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | २६.५.२००६ |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | -- |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपिलाची तारीख | २४.७.२००६ |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | २.९.२००६ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

ग्रामपंचायतीच्या विविध योजनांचा अनुदान / जमाखर्च तपशिलाबाबत. सन १९८९-९० ते २००४-२००५ पर्यंत सर्व ( अर्जातील १ ते १७ योजना )योजनांची माहिती तपशीलवार व प्रत्येक आर्थिक वर्षापमाणे स्वतंत्र मिळावी.

## विवेचन

वाकी (घेरडी), ता.सांगोला येथील ग्रामपंचायतीच्या सन १९८९-९० ते २००४-२००५ पर्यंतच्या बँक व्यवहाराच्या खाते उताऱ्यासह खर्चाचा तपशील व विविध योजनांबाबतची माहिती १७ मुद्याद्वारे अपीलकर्ता श्री.अल्लाबक्ष जमादार पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी (घेरडी) यांच्याकडे मागितली होती. श्री.उत्तम लक्ष्मण देवकाते यानीही अशाच स्वरुपाची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी (घेरडी) यांनी उत्तर न दिल्यामुळे श्री.पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, सांगोला यांच्याकडे अपील केले. तत्कालीन ग्रामसेवक श्री.एच.एस.हाके यांच्या कालावधीतील कार्यभार आपल्याकडे दिला नसल्यामुळे आपण माहिती देऊ शकलो नाही, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री.एम.जी.पवार यांनी दिले, ते मान्य करुन व 'माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत श्री.हाके यांना जबाबदार धरण्यात येत आहे,' असे नमूद करुन त्यांना ताकीद देणारा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला यांनी दिला. तसेच आठ दिवसात माहिती देण्याचा आदेश त्यांनी श्री.पवार यांना दिला. तरीही आपल्याला माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.पाटील व श्री.देवकाते यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.हाके यांनी आपल्याकडे दप्तरी पदभार दिला नाही, असे विद्यमान ग्रामसेवक श्री.पवार यांचे म्हणणे आहे, परंतु श्री.पवार यांनी जानेवारी २००४ मध्ये ग्रामसेवक पदाची सूत्रे

स्वीकारली, नऊ महिने श्री.हाके यांनी पदभार का दिला नाही, त्यांच्यावर कारवाई का केली नाही, श्री.पवार यांनी घेतलेली रजा कोणत्या स्वरुपाची आहे, इ.मुद्दे श्री.पाटील आणि श्री.देवकाते यांनी अपिलात, तसेच आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी उपस्थित केले. तत्कालीन ग्रामसेवक श्री.हाके यांनी आपल्याकडे दप्तरी पदभार दिला नसल्यामुळे आपल्याला तीस दिवसांच्या मुदतीत माहिती देता आली नाही, असे श्री.पवार यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले, तर श्री.हाके यांच्याकडे अन्य दोन ग्रामपंचायतींचा पदभार असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.जे.आर.अडसूळ यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

गटविकास अधिकारी श्री.जे.आर.अडसूळ यांनी संबंधित ग्रामसेवकांचा लेखी खुलासा दि.५.२.२००८ पर्यंत घ्यावा. या संदर्भात परिपूर्ण माहिती घेऊन श्री.अडसूळ यांनी दि.११.२.२००८ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा, त्यानंतर शास्तीसह अन्य मुद्दयांबाबत निर्णय घेण्यात येईल, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार संबंधित ग्रामसेवकांची निवेदने व अहवाल आयोगाला प्राप्त झाले आहेत. त्यातून पुढील बाबी निदर्शनास येतात :

श्री.हाके हे डिसेंबर १९९४ ते १४ डिसेंबर २००५ या कालावधीत वाकी (घेरडी) येथे ग्रामसेवक होते. दि.१४.१२.२००५ रोजी त्यांची बदली वाकी येथून झाली व दि.३१.१२.२००५ रोजी श्री.एम.जी.पवार यांना वाकी(घेरडी) येथील ग्रामपंचायतीचा अतिरिक्त पदभार देण्यात आला.

ग्रामीण रोजगार योजना वगळता इतर पूर्ण पदभार दि.३१.१२.२००५ रोजी श्री.पवार यांना आपण दिला, असे श्री.हाके यांनी त्यांच्या खुलाशात नमूद केले आहे.

जानेवारी २००६ पासून आपण वाकी(घेरडी) येथील ग्रामसेवक म्हणून काम पहात असून श्री.हाके यांनी अद्याप दप्तरी पदभार दिलेला नाही, असे लेखी निवेदन दि.१६.८.२००६ रोजी श्री.पवार यांनी केले आहे. आपल्याकडे वाकीचा अतिरिक्त पदभार देण्यात आला, तेव्हा मौजे आलेगाव ग्रामपंचायतीचा मुख्य पदभार होता. दि.१७.४.२००७ रोजी वाकीचा दप्तरी पदभार आपण सोडला. मे ते ५ ऑगस्ट २००६ आपण वैद्यकीय रजेवर होतो, श्री.हाके यांच्या

काळातील कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळेच आपण माहिती देऊ शकलो नाही, असे श्री.पवार यांनी दि.२.२.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या खुलाशात वरील माहितीसह नमूद केले आहे. असेही नमूद केले आहे. श्री.हाके यांच्या काळातील आणि श्री.पाटील व श्री.देवकाते यांनी मागितलेल्या माहितीतील बहुसंख्य मुद्दयांचे अभिलेख ग्रामपंचायतीच्या दप्तरी उपलब्ध नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

डिसेंबर १९९४ ते दि.१४.१२.२००५ या काळातील माहितीबाबत आपल्याला स्थानिक राजकारणात ओढून त्रास देण्यासाठी माहिती मागितली जाते आहे, असे श्री.हाके यांनी दि.५.२.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या लेखी खुलाशात म्हटले आहे. श्री.पाटील यांच्या दि.२४.७.२००६ च्या अपिलाची सुनावणी होऊन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी यांनी दि.९.९.२००६ ला निर्णय दिल्यानंतर संबंधित माहितीच्या छायांकित प्रती देण्यास आपण श्री.पाटील यांच्या घरी गेलो असता त्यानी त्या नाकारल्या. या काळात मेडशिंगी व राजापूर या ग्रामपंचायतींचा पदभार आपल्याकडे होता. या पंचायतींची विकासकामे, त्या संबंधातील बैठका आदींमुळे आपल्याला विहित मुदतीत माहिती देणे शक्य झाले नाही. याच काळात राजापूर ग्रामपंचायतीला 'निर्मल ग्राम पुरस्कार' प्राप्त झाला. मेडशिंगी येथील कुटुंब कल्याण कार्यक्रमात अत्युत्कृष्ट काम केल्याबद्दल आपल्याला पुणे विभागीय आयुक्तांकडून प्रशस्तीपत्रक देण्यात आले, तसेच आपल्या सेवाकाळात चांगल्या कामाबद्दल दोन आगाऊ वेतनवाढी, सोलापूर जिल्हा परिषदेचे प्रशस्तीपत्रक मिळाले आहे, असेही श्री.हाके यांनी खुलाशात नमूद केले आहे.

अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.जे.आर.अडसूळ यांनी दि.६.२.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या अहवालानुसार श्री.एम.जी.पवार व श्री.एच.एस.हाके यांना जबाबदार धरले आहे. माहिती देण्याची जबाबदारी या दोघांचीही होती. त्यामुळे या विलंबाला या दोघांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कार्यवाही करावी, अशी शिफारस श्री.अडसूळ यांनी अहवालात केली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांतून पुढील बाबी स्पष्ट होतात:

श्री.पाटील यांनी मूळ अर्जाच्या अनुषंगाने अपिलात खुलासा मागणे, तसेच कार्यवाहीची मागणी करणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार योग्य नाही.

श्री.पाटील व श्री.देवकाते यांनी मागितलेली माहिती सन १९८९ ते २००४-२००५ या कालावधीतील आहे. श्री.हाके हे डिसेंबर १९९४ ते १४.१२.२००५ या काळात वाकी (घेरडी) येथे ग्रामसेवक या पदावर होते. माहितीची मागणी करणारा अर्ज श्री.पाटील यांनी दि.२६.५.२००५ रोजी केला, तेव्हा श्री.एम.जी.पवार वाकीचे ग्रामसेवक होते. माहिती देण्याची जबाबदारी ज्याच्या काळातील माहिती आहे त्याची नसून त्यावेळी पदभार असलेल्या जन माहिती अधिकाऱ्याची-म्हणजेच श्री.पवार यांची आहे. परंतु श्री.हाके यांनी कागदपत्रे दिली नसल्यामुळे आपल्याला माहिती देता आली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. श्री.हाके यांनी याबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही.

दप्तरी पदभार घेताना श्री.हाके यानी आपल्याला बँक पासबुके दिलेली नव्हती, नवीन पासबुके घेऊन आपण कामकाज पाहिले, असे श्री.पवार यांनी लेखी नमूद केले आहे. मात्र जानेवारी २००६ पासून ग्रामसेवकपदी असताना श्री.पवार यांनी संबंधित कागदपत्रांबाबत मे २००५ पर्यंत तक्रार अथवा अन्य मार्गाने प्रयत्न केल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्याचबरोबर मेडशिंगी व राजापूर या ग्रामपंचायतींचा कारभार सांभाळतानाही अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार आपण छायांकित प्रत देण्यासाठी श्री.पाटील यांच्या घरी गेलो, असे श्री.हाके यांनी नमूद केले आहे. वाकी (घेरडी) ग्रामपंचायतीच्या दप्तरी नसलेल्या या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी कशा उपलब्ध केल्या, हे त्यांच्या निवेदनातून स्पष्ट होत नाही.

अभिलेखाबाबत श्री.पवार आणि श्री.हाके यांची निवेदने व त्या अनुषंगाने चौकशी करुन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालातील निष्कर्ष पाहता श्री.हाके, श्री.पवार हे दोघेही माहिती न देण्याबाबत दोषी ठरतात, त्यामुळे ते दोघेही शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) श्री.एच.एस.हाके व श्री.एम.जी.पवार हे दोघेही माहिती न देण्याबाबत दोषी असल्यामुळे त्यांना रुपये २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती सप्टेंबर २००८ च्या वेतनापासून ऑक्टोबर २००८ मध्ये मिळणाऱ्या तीन महिन्यांच्या वेतनातून ( तीन हप्त्यात) प्रत्येकी रु.१२,५०० याप्रमाणे वसूल करुन ती दि.१५.९.२००८ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला श्री.जे.आर.अडसूळ यांनी करुन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. तसेच या शास्तीबद्दल संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंद घेऊन त्याचाही पूर्तता अहवाल सोबत सादर करावा. ही जबाबदारी गटविकास अधिकारी यांची राहील.

पुणे
दि. ३१/७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

ऑगस्ट-०८-२२-२५

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२७ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्रीमती बनाबाई धोंडीराम पाटील द्वारा<br>श्री. रघुनाथ महिपती हळदकर<br>रा. चंद्रे मोरेवाडी, पो. का. वाळवे,<br>ता. राधानगरी, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,<br>करवीर, जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा उपनिबंधक, सहकार संस्था, कोल्हापूर | गैरहजर |

मागणी केल्यानुसार आपल्याला परिपूर्ण माहिती मिळाली असून अपील निकाली ठेवण्यास अपीलकर्त्याने दि.९.७.२००८ च्या पत्रानुसार आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 .९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२८ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. मोहन रघुनाथ लोहार<br>१४४५, रोहिदास चौक, कागल, ता. कागल<br>जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, कागल<br>ता. कागल, जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, कागल<br>ता. कागल, जि. कोल्हापूर | गैरहजर |

एकूण महसुली लेखे किती व कोणते याबाबतच्या एकूण सात मुद्यांची माहिती अपीलकर्ता श्री. मोहन रघुनाथ लोहार यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कागल यांच्याकडे मागितली होती.

उपरोक्त माहिती प्राप्त झाली, परंतु चुकीची व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरून श्री. लोहार यांनी अपील दाखल केले. अपीलकर्त्यास पूर्ण माहिती दिलेली आहे, परंतु ती अपुरी असल्याची त्यांची धारणा आहे. अपीलकर्त्याने पुन्हा स्पष्ट मागणी केल्यास आवश्यक ती माहिती तात्काळ दिली जाईल, असे जन माहिती अधिकारी यांनी कथन केले. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता श्री. लोहार यांनी मागणी केल्यानुसार त्यांना माहिती हवी असलेल्या प्रश्नांची उत्तरे दिल्याचे दिसून येते. श्री. लोहार यांनी अधिक माहिती मागितल्यास देण्याची जन माहिती अधिकारी यांची तयारी आहे. श्री. लोहार यांनाही ते मान्य असल्याचे उभय बाजूंनी लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 22.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३० / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुभाष खुशालचंद मालपाणी<br>रा. ९/८८, सांगली रोड, रेंदाळकर मळा,<br>इचलकरंजी, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | जिल्हा प्रकल्प अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर |

अपीलकर्ता श्री. सुभाष खुशालचंद मालपाणी यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे दि. १७.११.२००७ रोजीच्या अर्जान्वये मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद यांनी दिलेल्या नेमणुकासंदर्भात राज्यमंत्र्यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारी संदर्भात काय कार्यवाही झाली, याबद्दल माहिती मागितली होती. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही, अशी श्री. सुभाष खुशालचंद मालपाणी यांची तक्रार असल्याचे दिसून येते. अपिलीय प्राधिकारी यांनी अपील मान्य करुन आठ दिवसांत अपीलकर्त्यास मोफत माहिती देण्याचे आदेश दिले. दि. २६.३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पत्र देऊन मुद्दा क्र.३ व ४ विषयी स्पष्टीकरण केले आहे. इतर मुद्दयांची माहिती अपीलकर्त्यास दिली आहे.

अपीलकर्त्याच्या तक्रारी संदर्भात चौकशी सुरु असून सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 22.७.२००८

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**